Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401
Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 18/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## थोर ज्ञानोपासक, ग्रंथकार चिंतामण वैद्य

चिंतामण विनायक वैद्य हे एक थोर ज्ञानोपासक, महाभारत-रामायणाचे संशोधक-मीमांसक व चतुरस्र ग्रंथकार होते. त्यांचा जन्म १८ ऑक्टोबर १८६१ रोजी कल्याण (ठाणे जिल्हा) येथे झाला. वडील विनायकराव कल्याणला वकिली करीत. चिंतामणरावांचे शिक्षण कल्याण तसेच मुंबईच्या एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजात झाले. एम.ए. आणि एलएल बी. झाल्यानंतर काही काळ कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथे मुनसफ म्हणून व नंतर ठाण्याच्या कोर्टात वकील म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर उज्जैन येथे न्यायाधीश पदावर ते रुजू झाले.

पुढे ग्वाल्हेर संस्थानच्या सरन्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. सेवानिवृत्तीनंतर १९०५ सालापासून लोकमान्य टिळकांचे सहकारी म्हणून ते कार्य करू लागले. राष्ट्रीय शिक्षणाचे काम त्यांनी आस्थेने व निष्ठेने केले. कोलकाता, सुरत आदी काँग्रेस अधिवेशनांना ते टिळकांबरोबर गेले. टिळकांच्या पश्चात वैद्यांनी महात्मा गांधीजींचा मार्ग अनुसरला. वेगवेगळ्या समित्यांवर काम करणे, अहवाल लिहिणे ही कामे त्यांनी गांधींच्या मार्गदर्शनाखाली केली. पुढे चिंतामणरावांनी राजकारण सोडले. त्यांनी १८८९ ते १९३४ या काळात विपुल लेखन केले. त्यांचे स्फुटलेखन केसरी, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. यापैकी थोडेच लेखन ग्रंथरूपाने संग्रहित झाले. इंग्रजी (९) व मराठी (२०) अशा त्यांच्या एकूण प्रकाशित ग्रंथांची संख्या एकोणतीस आहे. महाभारत : ए क्रिटिसिझम, संक्षिप्त महाभारत, रिडल ऑफ रामायण, अबलोन्नतिलेखमाला, एपिक इंडिया, मानवधर्मसार, दुर्दैवी रंगू, श्रीकृष्ण चरित्र, महाभारताचा उपसंहार, हे त्यांचे काही ग्रंथ प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक-सांस्कृतिक संस्थांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. १९०८ साली पुणे येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अशा या थोर ज्ञानोपासकाचे २० एप्रिल १९३८ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Oct 18, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401